Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

# संत कबिरांच्या साहित्यातील सामाजिक विचार

**मुरलीधर बाबाराव हंबर्डे**
संशोधक विद्यार्थी

**प्रास्ताविक**

संत कबीर यांच्या साहित्यातील सामाजिक विचार पाहण्याअगोदर कबीरपूर्व भारतातील सामाजिक विचाराचा थोडक्यात आढावा घेणे, तो समजून घेणे आवश्यक आहे. गौतम बुद्ध ते सम्राट अशोक यांच्या काळात भारतात सामाजिक विचारांची जडणघडण मजबूत होती. परंतु, वैदिक परंपरेत सामाजिक विचाराला वेगळे वळज मिळाले. ज ारज, 'मनुस्मृती' या ग्रंथानुसार भारतीय समाजव्यवस्थेत कामाच्या आधारावर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशी विभागणी करण्यात आली होती. परंतु ही वर्णव्यवस्था वैदिक परंपरेने अधिक घट्ट केली. वैदिक परंपरेने ज्या १८ पुराणांची निर्मिती केली, त्यामध्ये 'वर्णरचना' ही मानवनिर्मित नसून ती ईश्वरनिर्मित आहे, हे समाजमनावर बिंबविले गेले होते. यानुसारच प्रत्येक मनुष्य हा पूर्वजन्माच्या कर्मानुसारच वरील चार वर्णात जन्म घेत असल्याचे स्पष्ट केले; त्यामुळे व्यक्तीला एका वर्णातून दुसऱ्या वर्णात प्रवेश करण्यासाठी बंदी घालण्यात आली होती. व्यक्ती हा त्यांच्या कर्माने श्रेष्ठ ठरत नसून त्यांच्या जन्मावर श्रेष्ठ ठरतो; असा सिद्धांत मांडला गेला.

प्रथमतः वर्णव्यवस्था ही कर्माच्या आधारे निर्माज केली होती. त्यामध्ये बदल करून नंतर कर्माऐवजी जन्मावर आधारित मानली गेली. यातूनच पुढे जाती आणि उपजातीचा उदय झालेला दिसून येतो. वर्णव्यवस्थेने जातीचे रूप धारण केल्यानंतर तिचा उद्रेक होऊन तिने व्यक्ती-व्यक्तीमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना निर्माण करून मानवजातीला काळीमा फासला. जातीयतेच्या वरवंट्याखाली भरडल्या जाणाऱ्या जातींना एकतेमध्ये व समानतेच्या धाग्यात बांधण्यासाठी तत्कालीन परिस्थितीमध्ये अनेक संप्रदाय उदयास आले होते. यामध्ये शैव संप्रदायामध्ये नाथ संप्रदाय, वीरशैव संप्रदाय, कश्मीरी शैव संप्रदाय, तमिळ शैव संप्रदाय, नंदिनाथ संप्रदाय वैष्णव संप्रदायामध्ये गौडीय वैष्जव संप्रदाय, रामानंदी संप्रदाय, कृष्ण प्रणामी संप्रदाय, राधावल्लभ संप्रदाय, शाक्त संप्रदाय, सांख्य संप्रदाय, थेरवाद, महायान, वज्रयान, झेन नवयान, श्वेतांबर, दिगंबर, सुफी संप्रदाय, भागवत संप्रदाय आदींचा उल्लेख करता येईल. या संप्रदायामध्ये भारतातील अनेक संतांचे मोठे योगदान राहिले आहे. यामध्ये संत कबीर हे आघाडीचे संत म्हणून सर्वत्र ओळखले जातात. संत कबीर यांनी समाजव्यवस्थेतील जातीयता, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, कर्मकांड, शोषण आणि स्त्रियांना कनिष्ठ स्थान देणाऱ्या व्यवस्थेवर कडाडून हल्ला केला. तसेच त्यांनी विषमताधिष्ठित वर्णव्यवस्था आणि जातीयतेचा पुरस्कार करणारे स्मृती, शास्त्र, धर्मग्रंथ आणि पुराणाचे खंडणदेखील केले. त्यामुळे संत कबीर यांच्या कार्याची भारताला मोठी देण असून त्यांच्या सामाजिक विचारांचा आढावा पुढीलप्रमाणे घेतला आहे.

**संशोधन विषयाचे उद्दिष्टे**

१. संत कबीरांचे जातीव्यवस्थे संबंधी विचारांचा आढावा घेणे.
२. संत कबीरांचे अंधश्रद्धा व कर्मकांडा विषयी विचाराचा अभ्यास करणे.

**जातीव्यवस्था**

समाजातील थोतांडावर कडक शब्दांत आसूड ओढणारा आणि हजारो ग्रंथांचे पांडित्य खुजे करणारा पुरोगामी संत म्हणजे संत कबीर होत. त्यांनी तत्कालीन अनिष्ट रूढींवर जोरदार प्रहार केले. निर्भीडता हे त्यांच्या पदांचे मुख्य वैशिष्ट्य असून, तत्कालीन समाजाचे अवगुण त्यांनी अत्यंत परखडपणे दाखवून दिले. कबीर हे मानवजातीचे, मानवतेचे पुजारी होते. त्यांनी कुठल्याही प्रकारचा धर्मभेद, पंथभेद, जातीभेद न करता सर्वांना एकाच माळेत गुंफण्याचा प्रयत्न केला. जातीव्यवस्थेचे उगमस्थान हे वर्णव्यवस्थेत असल्यामुळे वर्णव्यवस्थेविषयी संत कबीर यांची ज्ञाय भूमिका होती, हे पाहणे प्रथमतः आवश्यक आहे.

**पंच बरन दस दुहिए, एक दूध देखौ पति आई।**
**कहै कबीर ससा करि दूरि, त्रिभूननाथ रहवा भरपूरि।।**

तत्कालीन प्रस्थापितांनी श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच या भ्रामक कल्पनेने समाजात विषमता निर्माण केली. त्यामुळे एकसंघ समाजव्यवस्थेला छेद जाऊन लहान-लहान गटांत त्यांची विभागणी झाली. यातून श्रेष्ठ-कनिष्ठ या भावनेतून संघर्षदेखील वाढीस लागला होता. त्यामुळे संत कबिरांनी जातीव्यवस्थेला आळा घालण्यासाठी वरील दोह्यामध्ये म्हटले आहे की, वेगवेगळ्या पाच प्रकारच्या दहा गाईचे दूध काढून त्यांची पारख केली असता, ते एकसारखेच असते. गाईचे रंग भिन्न-भिन्न आहेत. परंतु, त्यांच्या दुधात भिन्नता आढळून येत नाही. यातून त्यांनी सांगितले की, व्यक्ती-व्यक्तींमध्ये कर्मावरून भिन्नता असली तरी त्यांच्यात जन्मावरून भेदभाव करणे अनैसर्गिक आहे. या दोह्याच्या माध्यमातून त्यांनी सर्व मानव एक असून त्यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे.

**ज़ु मरा है करि बासन धरिहू धोबी है मल धोऊं।**
**चमरा है करि रंगो अघौरी जाती-पांति कुल खोऊं।।**
**तेली है कोल्हू करिहाँ, पाप पुन्य दोऊं पैरों।**
**पंच बेल जब सूध चलाऊं राम जेवरिया जोरूं।**
**छत्री है करि मन कूं मूंडूं, बाढ़ी है कर्म बांढू।।**

ज्ञबीर यांनी वरील दोह्यात समाजातील बारा बलुतेदारांचे वर्णन केले आहे. याविषयी ते म्हणतात की, ज़ुंभार, धोबी, चांभार, तेली, सुतार, सोनार, गवळी या जातीचे त्यांच्या कार्यावरून समाजव्यवस्थेत स्वतंत्र स्थान आहे. जसे की, कुंभार मडके घडवणे, धोबी कपडे धुणे, चांभार चप्पल तयार करणे, तेली घाण्याच्या माध्यमातून तेल निर्मिती करणे, सोनार अलंज्ञार घडविणे, सुतार शेती उपयोगी अवजारे बनविणे आणि गवळी दही-दुधाचा व्यवसाय करणे. या जातींच्या कार्यात भिन्नता असली तरी त्यांच्या कार्याचा अंतिम उद्देश समाजातील व्यक्तींच्या गरजा भागवणे हाच आहे. या जातीव्यवस्थेचे विभिन्न कार्यावरून विभाजन झाले तरी त्यांना त्यांच्या व्यवसायावरून जातीत बंदिस्त करणे योग्य नाही. या संपूर्ण घटकांना संत कबीर यांनी समाजव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान दिले आहे.

**जाति न पूछो साधु की, पुछ लिजिए ज्ञान।**
**मोल करो तलवार की, पडा रहन दो म्यान।।**

वरील साखीमध्ये संत कबीर म्हणतात की, संत मंडळींची जात, धर्म, कूळ विचारण्याला काही महत्त्व नाही. तो कोणत्या जातीत किंवा धर्मात जन्माला आला, त्यापेक्षा त्याच्यात ज्ञानाची विद्वत्ता किती ठासून भरली आहे, ते पाहणे महत्त्वाचे आहे. ज्याप्रमाणे म्यानामध्ये तलवार जेव्हा बाहेर येऊन कर्तबगारी बजावत असते, तेव्हा तलवारीचे मोल करावे लागेल. परंतु, तलवारीऐवजी म्यानाचे मोल करणे संयुक्तिक ठरणार नाही. या ठिकाणी कबिरांना सांगावयाचे आहे की, पृथ्वीतलावर जन्म घेणारा प्रत्येक माणूस समान असून त्यांच्यात भेद करणे योग्य होजार -नाही.

माणसाच्या बाह्यांगापेक्षा अंतरंग महत्त्वाचे असून जन्माला येणारी प्रत्येक व्यक्ती ही श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसते तर त्यांच्या कर्मावर ती श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरत असते.

**छूतिहि जेवन, छूतिहि अंचवन, छूतिहि जय उपजाया।**
**कहं कबीर ते छूति विवरजित, जाके संग न माया।।**

भारतात अस्पृश्यतेचे काहूर एवढे माजले होते की, त्यामुळे सामान्य व्यक्तीला प्राण्यापेक्षाही हीन वागजूर दिली जात असल्याने त्यांना जीवन जगणे अशक्य झाले होते. यामुळे संत कबिरांनी अस्पृश्यता निवारण्यासाठी वरील दोह्यामध्ये म्हटले आहे की, व्यक्ती आपल्या भोजनात शुद्ध अन्न, फळे, दूध, दही, पाणी आदींचा वापर करतो. परंतु, हेच अन्न आणि पाण्याचे नंतर मल-मूत्रासारख्या घाणीत रूपांतर होते. तसेच बालक जन्माला येते वेळेस त्याला सर्व घाणीचा सामना करावा लागतो. मग मनुष्याचा जन्म मल-मूत्रात होतो तसेच व्यक्तीच्या पोटामध्ये घाण असताना दुसऱ्या व्यक्तीला अस्पृश्य किंवा कनिष्ठ ठरविण्याचा त्यांना अधिकारच दिला कोणी? ही अस्पृश्यता मानवनिर्मित असल्यामुळे त्यांच्यावर त्यांनी कठोर शब्दांत टीका केली आहे.

**हिन्दू कहै माही राम पियारा, तुर्क कहै रहिमान।**
**आपस में दोउ लरि मूए, मर्म न काहू जाना।।**

संत कबीर वरील दोह्यात म्हणतात की, हिंदू समाज रामाला आपले कुलदैवत मानतात, तर मुस्लीम समाज रहीम यांना कुलदैवत मानत असतो. सर्व मानवजातीचा जन्म हा योनीच्या मार्गानेच झालेला असतानासुद्धा त्याच्यात धर्माच्या नावावरून व्यक्ती व्यक्तींमध्ये भेद करणे चुकीचे आहे. स्वतःला काही जाती वरिष्ठ म्हणवून घेतात. मग त्यांचा जन्म वेगळ्या मार्गाने होणे अपेक्षित होते. हे सर्व ब्राह्मण जातीचे कटकारस्थान आहे. असा हल्ला दोह्याच्या माध्यमातून कबीर यांनी केला आहे.

**पंडित देखहु ऱ्हदय बिचारी को पुरूषा को नारी।**
**सहज समाना घट बोलै, बाको चरित अनुमा।**
**कहै कबीर हमहीं पै बौरे, से सम खलक सयाना।।**

वरील दोह्यात संत कबीर म्हणतात की, निसर्गतः स्त्री आणि पुरुष समान आहेत. त्यांच्यातील लिंगभेद सोडला तर स्त्री आणि पुरुषामध्ये समानता आहे. ज्या मातेच्या ओटीमध्ये पुरुष जन्म घेतो, त्याच मातेला अस्पृश्य किंवा कनिष्ठ असा भेदभाव करतो. अशा पंडित लोकांचा कबिराने घोर अपमान केला आहे. स्वतःला पंडित म्हणवून घेणाऱ्यांची तुलना ते अतिशय नीच, स्वार्थी आणि मूर्ख लोकांत करतात.

**रज गुन ब्रह्मा तम गुन संकर, सत गुन हरि हे सोई।**
**कहै कबीर एक राम जपहु रे, हिन्दू तुरूक न कोई।**

वरील दोह्यामध्ये संत कबीर म्हणतात की, मानवाने व्यक्ती-व्यक्तींमध्येच भेद केला नाहीतर धर्मानुसार देवाचीसुद्धा विभागणी केली आहे. काही जमातीने तर देवामध्येसुद्धा श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव केला आहे. जसे की, ब्रह्माचा-रजोगुणप्रधान, शिवाला-तमोगुणप्रधान तर विष्णूला सत्त्वगुणप्रधान. तसेच श्रेष्ठ जातीतील परशुराम, महादेव, विष्णू, बालाजी तर कनिष्ठ जातीतील पोचेमा, येडाई, मराई असाही गावपातळीवर भेद केलेला दिसून येतो. धर्मानुसार विचार करता, हिंदू-राम, मुस्लीम-रहीम मुहंमद पैजंबर, शीज-जुरू जोविंदसिंग, ख्रिश्चन-येशू ख्रिस्त अशी देवांची धर्मा-नुसार विभाजजी झालेली दिसून येते.

**वेद कुतेब दीन अरू दुनिया कौन पुरिष कौन नारी।**
**एक बूँद एके मल मूतर एक चाम एक गूदा।**
**एक ज्योति थै सब उत्पन्नां कौन बाहू मन कौन सूदा।।**

वरील पदावलीमध्ये संत कबीर म्हणतात की, प्रत्येक स्त्री-पुरुषाची उत्पत्ती ही आईच्या गर्भात एका विर्याच्या थेंबापासू-न झालेली असते. त्यामुळे दुनियातील कोणतेही वेद किंवा ग्रंथाला पुरुष किंवा स्त्रीमध्ये भेदभाव करण्याचा अधिकार नाही. स्त्री आणि पुरुषामध्ये समान रक्त, मांस, पेशी, हाडे, मल, मूत्र आणि कान, नाक, डोळा, हात, पाय, डोके इतर अवयव समान आहेत. त्यामुळे पुरुषांपेक्षा स्त्रिया कनिष्ठ आहेत, असा भेदभाव करणे खुळचटपणाचे लक्षण आहे.

**एकै त्त्चा हाड मल, एक रूधिंर एक गुदा।**
**एक बूँद से सृष्टि रची है, कौ ब्राह्मण को सूदा।**
**रजोगुण ब्रह्मा तमोगुण शंकर, सतोगुणी हरि होई।**
**कहहिं कबीर राम रमि रहिये, हिंदू तुरूक न कोई।।**

संत कबिरांनी जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्थेचा विरोध करून त्यांनी अखिल मानव जातीला एक समान मानले आहे. मानवनिर्मित विषमता निर्माण करणाऱ्या लोकांच्या विरोधात त्यांनी टोकाची भूमिका घेतली. याविषयी ते म्हणतात की, सृष्टीने प्रत्येकांना एकसमान बनवले आहे. प्रत्येक व्यक्तीचे पंचइंद्रिये एकसमान आहेत. तसेच सृष्टीचा पालनकर्ता एकच असल्यामुळे त्यांच्यात राम-रहीम, हिंदू-मुस्लीम किंवा रजोगुण-ब्रम्हा, तमोगुण-शंकर आणि सतोगुण-हरि (विष्णू) असा भेदभाव करता येणार नाही.

**ऐसा भेद विगूवानि भारी।**
**वेद कतेब दीन अरू दुनियाँ कीन पुरिख कौन नारी।**
**एक रूधिर एकै मल मूतर एक चाम एक गुदा।**
**एक बूँद तें सृष्टि रची, है, कौन ब्राह्मन कौन सूदा।।**

वरील पदावलीमध्ये संत कबिरांनी सर्व प्रकारच्या कृत्रिम भेदभावांना विरोध केला आहे. पंडित लोज ांनी धर्म, संप्रदाय, जाती, वर्गामध्ये विषमतेची कृत्रिम भिंत उभी केली. तसेच विषमतेला मजबूत करण्यासाठी धार्मिक ग्रंथामध्येसुद्धा विषमतेवर आधारित रचना केली आहे. सर्व स्त्री-पुरुष हे विर्यापासून बनले असल्यामुळे त्यांच्यात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असा भेद करणे अमंगळ आहे.

**जातीव्यवस्था जन्मजात -ाही**

संत कबिराने जाती-जातीमधील श्रेष्ठ आणि कनिष्ठ सिद्धांताचा अस्वीकार केला आहे. त्यांच्या मते, स्वतःला सवर्ण म्हणवून घेणारे आणि असवर्ण यांच्या जन्माचा मार्ग एकच आहे. तसेच श्रेष्ठ आणि कनिष्ठ असा भेदभाव जन्माच्या वेळीच विशिष्ट चिन्हाने होणे आवश्यक होते किंवा प्रत्येक जाती, धर्माचा आहे म्हणून त्यांच्यावर विशिष्ट खूणदेखील नसते मग व्यक्ती-व्यक्तींमध्ये भेदभाव कशावरून केला जातो. त्यामुळे संत कबिराने जात ही जन्मावरून ठरत नसल्याचे दाखवून दिले.

**१.२.१. जातीव्यवस्था ईश्वरनिर्मित नाही**

संत कबीर जातीव्यवस्था ही ईश्वरनिर्मित नसून ती मानवनिर्मित असल्याचे मानतात. जातीव्यवस्थेतील काही ठेकेदार लोज ांनी सवर्ज-असवर्ण तत्त्वाची भावना निर्माण केली. ते जातीव्यवस्थेला विरोध करताना म्हणतात की, सर्वांचे शरीर समान गुणधर्माने बनले आहे. प्रत्येकांतील रक्त, मांस, पेशी, हाडे, इतर सर्व इंद्रिये एकसमान आहेत. प्रत्येकांत समान जीव आणि आत्मा आहे. सर्वांचा जन्म एकाच मातेच्या गर्भातून झालेला आहे, त्यामुळे त्यांच्यात भेदभाव होणे अशक्य आहे. जातीव्यवस्था ही ईश्वरनिर्मित नसून काही धर्मांध ठेकेदारांनी ती निर्माण केलेली व्यवस्था आहे, असे संत कबीर म्हणतात.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

**१.२.२. समता आणि एकतेचा पुरस्कर्ता**

संत कबीर हे समाजामध्ये समता आणि एकतेचा पुरस्कार करणारे आहेत. त्यांच्या मते, हिंदू-मुस्लीम, सवर्ण-असवर्ण, श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्च-नीच यावरून समाजामध्ये भेदभाव करता येणार नाही. प्रत्येक जात आणि धर्मातील व्यक्ती एकसमान आहे, त्यामुळे त्यांच्यात भेद करणे योग्य नाही. स्वतः कबीर जात आणि धर्माला विरोध करून मानवजातीत सर्व समान आहेत, असे म्हणतात. समाजामध्ये जात आणि धर्मावरून जे काही अवडंबर माजलेले आहे, ते नष्ट करण्यासाठी त्यांनी उच्च कोटीचे प्रयत्न केले आहेत.

**१.२.३. वर्गहीन समाजाच्या स्थापनेला प्राधान्य**

समाजामध्ये वर्णाश्रम व्यवस्था, सामंतवादी व्यवस्था, जातिभेद, वर्ग वर्चस्व इत्यादिंना संत कबीर यांचा विरोध होता. कबीर हिंदू-मुस्लीम, सवर्ण-असवर्ण, श्रेष्ठ-कनिष्ठ इत्यादिंचा विरोध करीत होते. त्यांचे ध्येय मानवता, मानव एकता आणि समाजामध्ये समानतेची स्थापना करणे हेच होते. एकंदरीत वर्गहीन समाजव्यवस्था निर्माण करण्यावर त्यांचा भर होता. त्यामध्ये संत कबीर यांच्या समाजरचनेत जाती, धर्म, वर्ण, वर्ग, सवर्ण-असवर्ण, श्रेष्ठ-कनिष्ठ यांना कोणत्याही प्रकारचे स्थान नव्हते.

**अंधश्रद्धा, रूढी-परंपरा आणि कर्मकांडाशी संबंधित विचार**

वैदिक परंपरेने समाजात अंधश्रद्धा, रूढी, परंपरा आणि कर्मकांड यांच्या नावाखाली समाजाचे चोहोबाजूंनी शोषण केले जात होते. संत कबीर यांच्या काळात तर यांचे प्राबल्य जास्तच वाढले होते. वेद, ग्रंथ, मंत्र, पूजा-विधी यांच्यानुसारच समाजव्यवस्था चालत असे. धर्मज्ञान देणारे पुरोहित किंवा ठेकेदार यांनी धर्माच्या नावाखाली अनेक कु-कर्माला चालना दिली होती. सत्य, अहिंसा आणि त्याग याऐवजी नरबळी, पशूबळी, मूर्तिपूजा, यज्ञ, पाप-पुण्य, दोरी-गंडा, भानामती, नवस, विधी, तीर्थयात्रा, स्वर्ग-नरक इत्यादींना समाजात मानाचे स्थान होते. या समस्याने संपूर्ण समाज पोखरला गेला होता. अंधश्रद्धेला समाजाच्या सर्व स्तरातून समाजमान्यता मिळाली होती. ब्राह्मण वेद पठन करीत असले तरी त्यांना तत्त्वज्ञानाचा गंधही नव्हता. धर्माच्या सर्वोच्च स्थानी असलेला पुरोहित वर्ग स्त्रियांच्या मोहात रममाण झाला होता. हिंदू समाज मूर्तिपूजा करण्यात गुंग झाला होता तर साधू-संन्यासी दान-पुण्यात मग्न झाले होते. तर स्वतःला पुरोहित म्हणवून घेणाऱ्यांचे कार्य हे वेदाच्या माध्यमातून देवाला प्रश्न करणे, मंत्राच्या माध्यमातून चमत्कार करणे, श्राद्ध घालणे, धूम्रपान करणे, मादक पदार्थांचे सेवन करणे इत्यादीपुरते मर्यादित झाले होते.

**मूर्तिपूजेला विरोध**

प्राचीन आदिमानव आकाश, समुद्र, पर्वत, ढग, अग्नी, वृक्ष, प्राणी इत्यादिंना प्राकृतिक शक्ती समजून त्यांची पूजाविधी केली जात होती. त्यामुळे आदिमानव कोणत्याही प्रकारची मूर्तिपूजा करत नव्हते. आजदेखील निसर्गाच्या सान्निध्यात असलेले मानव मूर्तिपूजेला थारा देत नाहीत. परंतु, वैदिक काळामध्ये स्वतःला पुरोहित म्हणवून घेणाऱ्यांनी मूर्तिपूजेला चालना दिली. कबीरकालीन परिस्थितीमध्ये मूर्तिपूजेला समाजात मोलाचे स्थान प्राप्त झाले होते. प्रत्येक दगडाच्या मूर्तीत देव असतो, ही भावना सर्वसामान्य झाली होती. पुरोहितांनी स्वतःची दुकानदारी चालविण्यासाठी हिंदू धर्मात मानवाच्या जातीद्वारे विविध ३६ कोटी देव-देवतांची निर्मिती केली गेली. त्यामुळे मूर्तिपूजेच्या माध्यमातून सामाजाचे मोठ्या प्रमाणात शोषण होत होते. यासाठी कबिरांनी समाजात जागृती करण्यासाठी पुढीलप्रमाणे विचार मांडले-

**पांहण केरा, करि पूजैं करतार।**
**इही भरोसै जे रूहे, ते बूडे काली धार।।**

वरील साखीमध्ये संत कबीर म्हणतात की, दगडाची मूर्तिपूजा करून जर ईश्वरप्राप्ती होत असेल तर मी पूर्ण पहाडाची पूजा केली असती. ज्या व्यक्तीनी देवाची मूर्ती निर्माण केली त्या निर्मात्याचे कोणतेही प्रश्न सुटले नाहीत. मग

ही मूर्ती निर्मात्याचे प्रश्न सोडवू शकत नाहीत तर तुमचे कसे सोडवणार ? असा प्रश्न कबिरांनी समाजापुढे उपस्थित करून मूर्तिपूजेला विरोध केला.

**पत्थर पूजे हरि मिलै, तौ मैं पूजौ पहार।**
**तातै ये चक्की भली, पीसि खाय संसार।।**

कबीर म्हणतात की, जर दगडाच्या मूर्तीची पूजा केल्याने ईश्वर आपली इच्छा पूर्ण करत असेल तर मग व्यक्तीला कष्ट करावयाची काय गरज आहे. असे असेल तर मी पूर्ण पहाडाची पूजा केली असती. आपल्या घरामध्ये दगडाचे जाते असते; पण त्याची पूजा कोण करीत नाहीत. खरे तर त्या जात्यामधील दळलेल्या धान्याच्या पीठावरच आपले पोट आपण भरत असतो. समाज मात्र जात्याची पूजा न करता दगडाच्या देवाचीच पूजा करतो.

**जूब खाड है खीचडी माहिं पडा टूक लूण।**
**पेडा रोटि खाइ करि गला कटावै कोंण।।**

संत कबीर स्वतःला पुरोहित म्हणवून घेणाऱ्यांचा सामना करताना म्हणतात की, जे लोक मूर्तिपूजेमध्ये गुंतलेले असतात, ते जीवनात यशस्वी होऊ शकत नाहीत. असे लोक ऐतखाऊ असून यामुळे इतरांना त्रास होत असतो. असेच लोक सर्वसामान्यांच्या मानगुटी बसून रुचकर भोजनाचा स्वाद घेत असतात. त्यामुळे अशा लोकांना हद्दपार करण्यासाठी संत कबिराने मूर्तिपूजेला विरोध केला आहे.

**जो पत्थर कौ कहिते देव, ताली विरथा हौ वै सेव।**
**ना पत्थर बोलै ना कठू देई फोकट कर्म निह फल है सेई।**
**जो मिरतक को विष्टा मांहि रूलाई, तौ मिरतक का क्या घटि जाई।।**

संत कबीर वरील दोह्यात मूर्तिपूजेचा विरोध करताना म्हणतात की, व्यक्ती दही, दूध, काजू, बदाम, फळे स्वतःच्या पोटाला न खाता दगडाच्या मूर्तीला अर्पण करतो. तसेच फूल आणि पाने तोडून मूर्तीला वाहतो. ज्याप्रमाणे मानवाचे शरीर जेव्हा मृत होते, तेव्हा त्याला चंदन लावले काय? आणि पंचपक्वान वाढले काय? यांचा त्याला काहीही फायदा होत नाही. त्याचप्रमाणे निर्जीव दगडाला पंचपक्वान वाढल्याने काय साध्य होणार आहे.

**कौन विचारि करत है पूजा, आतम राम अवर नहि दूजा।**
**बिन प्रतीतै पाती तोडै, ज्ञान बिना देवलि सिर फोडै।**
**लुचरी लपसी संघारै, द्वारै ठाठा राम पुकारे।।**

संत कबीर म्हणतात की, दगडाच्या मूर्तीसाठी तुम्ही फुले, फळे वाहता, अज्ञानामुळे मूर्तीपुढे स्वतःचे शीर फोडून घेता, तिच्यापुढे नतमस्तक होता. अशा वाईट प्रवृत्ती करण्यापेक्षा समाजातील दीन, आंधळे, पांगळे, खुळे, वृद्ध यांची सेवा केली तर निश्चित ती ईश्वरसेवा घडेल. भुकेल्याला भाकर द्या, आंधळ्याला घरी पोच करा, विकलांगाना आधार द्या, वृद्धांना आसरा द्या, मुला-बाळांवर चांगले संस्कार करा त्यामुळे समाजातील दुःख नष्ट होऊन सदृढ समाज निर्माण होईल. त्यामुळे व्यक्तीने देव, धर्म यांच्या पाठीमागे लागण्यापेक्षा मानवसेवा करण्याचा सल्ला संत कबिरांनी दिला आहे.

**सारांश**

कबीरकालीन विशेषतः पंधराव्या शतकातील सामाजिक परिस्थिती अत्यंत वाईट होती. समाजात अज्ञानी लोकांची संख्या प्रचंड होती. त्याचा परिणाम म्हणून अनेक रूढी, परंपरा, स्वार्थी आणि विकृत प्रवृत्तींचे प्राबल्य वाढलेले होते. याचा फायदा समाजातील धूर्त, चालाख आणि पाखंडी लोक उठवित होते. यामुळेच समाजाचे स्वास्थ्य पूर्णपणे बिघडून गेले होते. या पार्श्वभूमीवर संत कबीरांनी साहित्याच्या माध्यमातून समाजजागृती केली. कबिरांची दृष्टी

सूक्ष्म आणि सखोल असल्यामुळे समाजातील विकृतींना त्यांचा नेमकेपणाने हेरले आणि त्यावर प्रखर वाणीतून प्रहार केले. ढोंगी, पाखंडी लोकांचा त्यांनी कठोर शब्दांत समाचार घेतला.

**संदर्भग्रंथ**

१. डाहाट धनराज, कबीर व्यक्तित्त्व आणि विचार, संकेत प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९५
२. श्यामसुंदरदास बी.ए., कबीर ग्रंथावली, नागरी प्रचारिणी सभा, काशीद्वारा प्रकाशित, छठवाँ संस्करण, २०००
३. तिवारी पारसनाथ, कबीर वाणी सुधा, राका प्रकाशन, इलाहाबाद,
४. सिंह वासुदेव, कबीर के सामाजिक विचार, कबीर अनुशीलनः संपादक प्रेमशंकर त्रिपाठी,
५. देसाई रघुनाथ गणपती, कबीर और तुकाराम के सामाजिक विचार, ए.बी.एस.पब्लिकेशन, वारासणी, प्रथमावृत्ती, २०१०
६. सिंह पुष्पपाल, कबीर ग्रंथावली सटीक,
७. चतुर्वेदी राजेश्वर प्रसाद (संपा.), कबीर ग्रंथावली,
८. जु लकर्णी सुनील, कबीर और तुकाराम के काव्य में प्रगतिशील चेतना, बुलबुले सुहास, संत कबीर अमृतवाणी, प्रकाशक, रवींद्र वसंत, गुर्जर गायत्री साहित्य, पुणे, प्रथमावृत्ती २००६